# बाजीराव मस्तानी

या वर्षाच्या सुरूवातीस बाजीराव मस्तानी चित्रपट आला. करोडोचा बिझनेस करून ९ पुरस्कार जिंकणारा! इतिहास जाणणाऱ्या नि ऐतिहासिक चित्रपटात मनोरंजनाच्या नावाखाली काहीही घुसडणं अयोग्य वाटणाऱ्या अनेकांनी मला मेल वा फोन करून हळहळ व्यक्त केली. कारण 'श्वेत प्रेमनां रक्तिम पडछाया' या माझ्या गुजराती कादंबरीस १९९५ सालच्या सर्वोत्तम कादंबरीचा पुरस्कार मिळाला होता. या चित्रपटाच्या निमित्तानं मराठी-गुजराती भाषा जाणणाऱ्यांनी या महाकादंबरीची नुसती आठवण काढली नाही तर ती संक्षिप्त स्वरुपात मी मराठीत आणावी अशी गळ घातली. एका रसिकानं तर कादंबरी आणि चित्रपटाची वारंवार तुलना करून विशिष्ट मुद्दा कादंबरीत कसा अधिक चांगला मांडला आहे हे उदाहरणे देऊन (८४) पत्र लिहिलं. अशा वाचकांची पत्रे कोणत्याही पुरस्काराहून महत्वाची वाटतात. म्हणून त्यांच्या इच्छेस मान देण्याचा शब्द देऊन मी त्यांना पेशव्यांची त्रिशताब्दी साजरी झाली तेव्हा या कादंबरीच्या निर्मितीवेळी मिळालेल्या आनंद आणि व्यथेचा परामर्ष घेणारा लेख लिहिला होता तो पाठवला. तो हा लेख.

## ऐतिहासिक कादंबरी - जन्मकथा आणि व्यथा

महाराष्ट्राच्या इतिहासात शिवाजी महाराजानंतर थोरल्या बाजीरावांना मानाचा मुजरा होतो. हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रचणारे शिवराय सिंहासनारुढ झाले. थोरले बाजीरावांचे कर्तृत्वही वादातीत! ते अभिषिक्त राजे नव्हते. छत्रपतींना डावलून ते गादीवर बसू शकले असते. पण त्यांच्या मनात शिवरायांविषयी नितांत आदर! म्हणून त्यांनी हिंदवी स्वराज्याची निष्ठेने सेवा केली. शिवरायांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याची आस बाळगून गर्जना केली - मराठ्यांचे घोडे सतलजचे पाणी पितील नि बादशहावर जरब बसवतील. शक्ती, युक्ती नि योजनाबद्ध आक्रमणपद्धतीच्या जोरावर त्यांनी आपला शब्द खरा केला. मला बालपणापासून इतिहास घडवणाऱ्या महानुभावांविषयी जाणून घेणं आवडत असूनही थोरल्या बाजीरावांवर लिहिण्याचा विचार डोकावलाही नव्हता. तरी या महाकादंबरीचं लेखन झालं. प्रतिक्षिप्त क्रियेगत! यास कारण ठरलेला प्रसंग जुना झाला तरी तो प्रत्येक क्षण माझ्या स्मृतीमंजुषेत अक्षत राहिल.

पिढ्यांपिढ्यांपासून आमचं वास्तव्य गुजरातेत! गुजराती साहित्यक्षेत्रात वावर सुरू होऊन बराच काळ लोटला होता. लग्नानंतर मराठी समाजात वावरही नव्हता. अशावेळी नवऱ्याची मुंबईस बदली झाली. मराठी समाजात चाचपडत वावर सुरू झाला. मराठी साहित्य नि साहित्यिक नजरेस पडताच मला मराठीची तुटलेली नाळ जोडण्याची इच्छा झाली. मी मराठीत २-३ लेख लिहिले. ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र पिंगे यांनी त्यांचं स्वागत केल्यानं मला हुरूप आला. १९८८ च्या दिवाळीनंतर आम्ही मुलांना पुणं दाखवण्याचा विचार केला. घरच्या गाडीनं जाणार होतो. तेव्हा

नेमकं पिंगेही कामासाठी पुण्यास जायचे होते. आम्ही पाचजण असलो तरी सलील मोठा नव्हता. सहाजण गाडीत बसल्यास दाटी होणार नव्हती. म्हणून मी चाचरत त्यांना आमचा बेत सांगितला. साध्या स्वभावाचे पिंगे आमचे सहप्रवासी झाले.

वडीलांच्या मित्राकडे जाऊन मुलांना पुणं दाखवणार होतो. पण पुण्याशी परिचित नव्हतो. पिंगे स्वभावतः प्रवासी! त्यांनी बरीच माहिती दिली. केळकर वस्तुसंग्रहालयाची तोंडभर स्तुती करून ते पाहण्याचा आग्रह केला. मला वाटलं - सामान्य माणसानं केलेलं काम म्हणून कौतुक! बाकी म्युझियमची निर्मिती हैद्राबादच्या सालारजंग नबाब, बडोद्याचे सयाजीराव महाराज... अशा दिग्गजांचं काम! पण आम्ही उतरमर होतो अत्रे हॉल जवळ! तिथं जाणं सहज जमलं. मनात अपेक्षा न ठेवता गेलो तर सत्य कल्पनेहून कैकपटीनं देखणं निघालं. अनेक ऐतिहासिक वस्तू, केसरीचा पहिला अंक, कोथरुडहून आणलेला मस्तानी महाल... कितीतरी! हे एकट्यानं जमवणाऱ्यास सामान्य म्हणता येणार नाही, असं वाटत असताना चमत्कार घडला - जे घडलं त्यास माझ्यासारखी मनस्वी व्यक्ती चमत्कार समजते.

फोटो काढण्याच्या मनाईसाठी आम्ही हळहळत असताना भुवया नि पापण्याचे केस पांढरे झालेली जराजर्जर व्यक्ती कुणाचा हात धरून आली. या वयात वस्तुसंग्रहालय बघण्याचा उत्साह असलेल्या व्यक्तीविषयी मी आदर ल्यक्त केला. तेव्हा ते पर्यटक नसून या संग्रहालयाचे निर्माते केळकरकाका असल्याचं अनोळखी पर्यटकानं सांगितलं. त्यांच्याकडे फोटो काढण्याची परवानगी मागण्याचा भन्नाट विचार मी ओठी आणताच त्यानं काका इथल्या वस्तुंसाठी अत्यंत संवेदनशील आहेत नि स्वभावानं सनकीही असल्याची माहिती दिली. परवानगी देणं दूर ते जळजळीत अपमान करण्याची खात्री व्यक्त करून! प्रत्येक संधी कॅश ऑर काईंडमध्ये किंमत मागते, इथे किंमत साहस असेल तर ते मी केलं पाहिजे, असं मला वाटलं. केळकरकाका भोजन घेऊन मदतनिसाबरोबर आपल्या दालनात जात होते. 'केसरीया' करण्याच्या तयारीनं मी त्यांच्या मार्गात आडवी आले. त्यांचे कान फार क्षीण झाले होते. कंठशोष करण्याच्या तयारीनं मी संवादाचा विडा उचलला. अपेक्षेनुसार ते नकारघंटा वाजवू लागले. पण फोटोची आकांक्षा माझ्या मानगुटीवर बसली होती. म्हणून स्वस्तुती करणारा मूर्ख ठरतो, हे कळत असून मी माझ्या कामाचं उदात्तीकरण करू लागले. मी गुजराती लेखिका असून माझ्या ऐतिहासिक लेखनास वाचकांनी डोक्यावर घेतल्याचं स्वमुखानं सांगण्याचा निगरगट्टपणा मी केला. काकांनी गुजराती लेखिका छान मराठी बोलू शकते, याविषयी आश्चर्य व्यक्त केलं. त्यांना माझं बोलणं क्लिष्ट वाटण्याची शंका मनात दडपली नि मी माझ्या रुट्सना भिडले...

## मस्तानी महालातील गणेशमूर्ती



“थोरल्या बाजीराव पेशव्यांनी गायकवाडांना गुजरात सोपताना त्यांच्याबरोबर निवडक मराठी लोक दिले. त्यात आमचे पूर्वज होते. आमचे पणजोबा सयाजीराव गायकवाड (तिसरे) महाराजांच्या सैन्याचे कप्तान! त्यांनी पिलवाईच्या उठावात मर्दुमकी गाजवली. यासाठी त्यांचा सत्कार करून महाराजांनी त्यांना कप्तान आडनाव धारण करण्याचा हक्क दिला. म्हणून मी माहेरची कप्तान! मातुल घराण्यात स्व. तात्या टोपे माझ्या आजीचे मामा! खुद्द माझे जन्मदाते स्वातंत्र्य सेनानी! आईच्या अंगावर असताना मीही कारागहाची वारी केली. पूर्वसुरींबददल आदर असल्यानं कदाचित इतिहास घडवणाऱ्या महानुभवांच्या कार्याचा आदर माझ्या लेखणीतून झिरपतो. बडोदे नगरीस गुजरातेतील पुणे म्हणतात. तिथे मराठी माध्यमाच्या उत्तम शाळा आहेत. तिथे शिकल्यानं… “

तारसप्तकात चऱ्हाट लावणं आवडत नव्हतं. इतर चौघांच्या मुद्रेवर कंटाळा पाहून उत्साह ओसरत होता. पण केळकरकाका  कंटाळले नसल्याची जाणीव धीर देत होती. बोलण्याचा थकवा असतो, याचा तो पहिला अनुभव! म्हणून मी श्वासाची उसंत घेतली. लगेच ते म्हणाले, “पण तुमच्याजवळ कॅमेरा नाहीय.”

“आपण परवानगी दिली तर मी दहा मिनिटात कॅमेरा आणू शकेन.” सहचराची तत्परता!

“वर्दळीत फोटोंचं जमणार नाही.”

“आजोबा आपण फक्त हो म्हणा! इतरांना विनंती करून आम्ही जमवू सारं!” वर्षा म्हणाली. ते गप्पच! विचारमग्न! माझा धीर संपलेला! पण स्वाती आणि सलील लाघवी स्वरात म्हणाले, “आजोबा प्लीज….” केळकरकाकांनी मंद हसत सर्वांकडं बघितलं. त्याचा होकार जाणवल्यानं सलील वर्षाचा हात धरून निघण्याच्या पवित्र्यात म्हणाला, “मम्मी-पप्पांना असू दे इथंच. आपण कॅमेरा आणायला जाऊ!”

तिसऱ्या पिढीनं दिलेली दाद काकांना भावली असावी. कौतुकानं मुलांकडं बघत ते म्हणाले, “इतकी घाई नको.” नकाराचा संशय आलेली मुलं बावरली. पण काका आत्ममग्न होते. समाधानी स्वरात ते म्हणाले, “थोड्या वेळात लंचब्रेक होणार. मग पर्यटकांचा वावर नसताना फोटो घेणं सोयीचं होईल. फक्त एक अट…” ते मिश्किल स्वरात म्हणाले, “ पुण्यात नवे आहात. पप्पांना सोबत ठेवा. कबूल?”

“हो….!” तिघांचा उत्साहानं फसफसलेला कोरस! मग ते माझ्याकडे वळले.

“तुम्ही जाऊ नका. माझ्या खोलीत बसू. इथं न मांडलेला अनमोल खजिना दालनात आहे. माझं निस्सीम प्रेम आहे त्यावर! चोरीच्या भयानं ते इथं ठेवलेलं नाही. ते कुलूपबंद धन थोरल्या बाजीरावांच्या सूचनेनुसार गुजरातेत गेलेल्या नि तिथं कप्तानपद जपलेल्या स्वातंत्र्यसेनानीच्या

कन्येस दाखवून तिचं माहेरपण करावं म्हणतो. तिला साहित्यात कप्तानपद लाभो, असा आशीर्वाद देण्याची इच्छा आहे. वेळ काढणं जमेल?" मी डोळे विस्फारले. त्या क्षीण नजरेतलं वात्सल्य नि आशीर्वाद माझ्यासाठी आहेत यावर माझा विश्वास बसेना. पुन्हा प्रश्न कानी पडला नि संमोहित अवस्थेत मी त्यांच्या मागे गेले. त्यांच्या दालनात व्यतीत केलेले दोन-अडिच दिवसातील अमूल्य क्षण म्हणजे अमाप सुखाची बरसात! अनपेक्षितपणे लाभलेली!

**मस्तानी महालात बाजीराव पेशव्यांची बैठक.**



काकांसाठीही ही संधी अनपेक्षित असावी. त्यांच्या कार्यास तेजस्वी वलय! वलय आणि वयाचं अंतर पार करून लोक त्यांच्या समीप जात नसावेत. आवडत्या विषयावर गप्पांची संधी दुर्लभ ठरत असावी. कदाचित म्हणून ते तरुणाच्या उत्साहानं भरभरून बोलू लागले. प्रत्येक वस्तू दाखवताना ती का अनमोल ठरते, याची त्यांनी सविस्तर दिली. शेवटी मर्मबंधातील ठेव दाखवावी तसं एक बासन हाती घेऊन त्यांनी त्यावर अत्यंत प्रेमानं हात फिरवला. त्यात चौदा की सोळा इतिहासकालिन पत्रं होती. पेशव्यांच्या काळात लिहिलेली! तीन पत्रं साक्षात थोरल्या बाजीरावांच्या हस्ताक्षरातील! गुजरातेत फितूर दाभाड्यांचा बिमोड केल्याची खबर देणारं, मस्तानीच्या संदर्भात शाहुमहाराजांना लिहिलेलं आणि नर्मदातटाकी स्वयंघोषित वानप्रस्थ सोसताना चिमाजींना लिहिलेलं! माझा रोम रोम ताठरला! सर्व भारतीय भाषात आजही 'बाजीरावचा बेटा' हा शब्दप्रयोग आहे. अशा महानुभावाचं अक्षर विनासायास बघण्याचं सुदैव माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीस लाभणं माझ्यालेखी चमत्कारच! पोतडीतील बंद कागदांना विशिष्ट वास येत होता. तो मला केशर-कस्तुरीच्या सुवासाहून मोहक वाटला!

थोरल्या बाजीरावांच्या काळात लिहिलेली नि त्यांच्या नंतरच्या काळातील चार पत्रं बासनात होती. अंबाजीपंत पुरंदरे, त्यांचे चिरंजीव महादोबा आणि नाना फडणवीस यांच्या अक्षरातील! लिपी देवनागरी रनिंगहँडमध्ये लिहावी तशी! म्हणून पत्रवाचन मंद गतीनं होत होतं. काका मिश्किलपणे माझी तारांबळ बघत होते. त्यांच्या नजरेत चक्क बालकाचा खट्याळपणा दिसला नि मी खजील झाले. त्यांनी मृदू स्वरात ते वाचून दाखवू शकतील, असं सांगताच मी होकार दिला. पण...

स्वतः वाचताना मन एकाग्र होतं तसं कुणी वाचून दाखवत असल्यास होत नाही. ही संधी अत्यंत अनपेक्षितपणे पदरात पडल्यानं मी संमोहित अवस्थेत! काकांनी तिसरं पत्र संपवून चोथ्यास हात घातला. त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट थकवा! मी संकोचग्रस्त स्वरात म्हणाले, "मोठ्यानं वाचण्यात आपली शक्ती वाया जात असल्याची जाणीव मला निवांत ऐकू देत नाहीय. त्यामुळं काही मजकूर निसटतोय. त्यापेक्षा एक सुचवू?" त्यांची प्रश्नार्थक मुद्रा पाहून मी म्हणाले, "मला फक्त अर्ध्यातास हवा आहे. सर्व पत्रांच्या फोटोकॉपीज काढून मी आपणास पत्र परत करते. म्हणजे.. " त्यांच्या मुखावरील मार्दव ओसरल्याच्या संशयानं मी हैराण!

"पत्रवाचनात माझी शक्ती वाया जात नाहीय! कित्येक वर्षानंतर पुनर्वाचनाचा योग आला आहे! त्यात समोर सुजाण श्रोता! तरी...." ते अस्वस्थ स्वरात म्हणाले, "देहात प्राण असेतो या दालनातील कशास दालनाचा उंबरठा ओलांडू न देण्याचा दृढनिश्चय आहे."

"माफ करा! आपल्याला दुखवण्याचा हेतू नव्हता. मी फोटोसाठीच परवानगी मागितली. या दालनात येण्याचं सुख देऊन आपण मला जन्माचं ऋणाईत केलंय. लोकोत्तर महानुभावांची हस्ताक्षरं पाहून माझा लोभ वाढला. नकळत आपणास दुखवलं मी! याची खंत जन्मभर राहिल!"

दालनात असह्य मौन! चौथं पत्र त्यांच्या हातात खोळंबलेलं! मुद्रेवर थकवा! थांबावं की जावं ते मला कळत नसल्याचं ओळखून ते मृदू स्वरात म्हणाले, “निरोप देण्याची मला घाई नाही.”

“मनास घाई नसली तरी देहास सुखद कामाचाही थकवा लागतो!” माझा स्वर केविलवाणा!

“पुण्यात कुठवर आहात?” मी परवापर्यंत असल्याचं सांगताच ते म्हणाले, “आज संध्याकाळी नि उद्या सकाळ-संध्याकाळ येणं जमणार असेल तर पूर्ण मजकूर डिक्टेट करणं आवडेल मला! की महत्वाचा कार्यक्रम आहे मुलांबरोबर?”

“छे!” मी घाईनं म्हणाले, “अशा संधीपुढे कोणत्याही कामाचं महत्व नाही. आपल्या सोयीनुसार मी इतर कार्यक्रमांची आखणी करीन.” समाधान व्यक्त करून त्यांनी मला निरोप दिला.

आणि जणू रोमहर्षक इतिहासापुढची काळाची तिळा दूर झाली. पत्रात लिहिणाऱ्याच्या मानसिकतेचं दर्शन घडतं, असं मला वाटतं. थोरल्या बाजीरावांच्या शब्दातूनच नव्हे तर शब्दातील मोकळ्या जागेतूनही मला महाकाव्याची गुणगुण ऐकू येऊ लागली. बाजीराव, मस्तानी नि काशीबाई यांच्यातील भावनिक संबंध मला बिल्वपत्रासारखा वाटला. त्यात शेक्सपियरन ट्रॅजिडीची उंची गाठणारं अंधुक महन्मंगल कथानक दिसू लागलं. भारावल्या अवस्थेत ते कादंबरीत सादर करून कादंबरी काकांना अर्पण करण्याचा मानस मी ओठी आणला. अर्थात कादंबरीच्या लेखनासाठी पुरेसा अभ्यास करण्याचा शब्द देऊन!

अभ्यासावेळीही वैचारिक घुसळण चालू होती. संदिग्ध कथानक स्पष्ट होऊ लागलं. बहुपत्नीत्वास हरकत नसूनही नाटकशाळाके बाळगणं नि गणिकांचे उंबरठे झिजवणं स्टेटस सिंबॉल ठरण्याच्या काळात मस्तानी भेटेतो बाजीराव काशीबाईंशी एकनिष्ठ असणं मला त्यांच्या मनस्वी स्वभाचं प्रतिक वाटलं. शिवरायांचं स्वप्न पूर्ण करण्याची आस, काशीबाई नि इतर कुटुंबियाचे भावबंध या पलिकडे त्यांना काहीही नको होतं. तरी त्यांच्या जीवनात जिनं प्रवेश केला ती स्त्रीही सामान्य नव्हती. रुप नि कलागुणातच नव्हे तर समर्पण आणि शौर्यातही ती अनुपम होती. पेशव्यांनी शाहुमहाराजांना पाठवलेल्या पत्रात तिचा उल्लेख आमच्या कनिष्ट पत्नी वज्रचुडेमंडीत अखंड सौभाग्यवती मस्तानीबाईसाहेब असा आहे. तिच्या मुलाची मुंज करण्याचा त्यांचा हट्टाआग्रह सर्वविदित आहे. सारं जाणून घेताना मनात आंदोलनं उठत होती....

जगात रोमियो-ज्युलियट, हिर-रांझा, लैला-मजनू.... प्रेमिकांच्या जोड्या विख्यात आहेत. त्यात ही जोडी नसली तरी मला या जोडीचे निवडक पैलू या जोड्यांहून त्यांना अधिक मानाचं स्थान देण्यास समर्थ ठरावे असे वाटले. १) इतर प्रेमिकांप्रमाणे पेशवे फक्त प्रेम करत नव्हते. मस्तानीवरील प्रेम त्यांच्या बहुविध प्रतिभेचा एक पैलू! २) मस्तानी केवळ नृत्य-गायनात निपुण नव्हती. लावण्य नि कलेइतकीच समर्पण आणि शौर्य तिची बलस्थानं! ३) मस्तानीशी संबंध

**केळकरकाका आणि मी**



स्थापित झाल्यावरही पेशवे काशीबाईंवर अपार प्रेम करत. म्हणून केवळ एकमेकांवर लट्टू झालेल्या प्रेमिकांच्या जोड्यांच्या भाऊगर्दीत या त्रिकुटाचे भावनिक संबंध मला पावन बिल्वपत्रासारखे वाटले. चिमाजींचं मन जपणाऱ्या, मातेसमोर आदरानं उभं राहणाऱ्या, धर्माचरणासाठी ब्राह्मवर्गास निरामय वातावरण प्रदान करणाऱ्या पेशव्यांच्या मनस्वी आक्रोशाचे पडसाद मला ऐकू येऊ लागले....

"मस्तानीच्या गुणांकडे दुर्लक्ष करून केवळ ती यवन असण्यास का महत्व दिलं जातं? तिला ठेवण्यास मान्यता देणारे तिला पत्नी म्हणताच का चवताळतात? यवनांवर मिळवलेल्या विजयाची स्तुती होते तर यवन स्त्रीस हिंदू होण्याची इच्छा निर्माण करण्यास कुणी यवनांवरील विजय का समजत नाही? बजाजीराव निंबाळकर मुस्लिम झाल्यावर शिवरायांनी त्यांना परत हिंदू करून घेतलं होतं. धर्म बदलण्याची जबरदस्ती नसावी पण मस्तानी स्वेच्छेनं हिंदू होऊ इच्छिते तर तिला विरोध का व्हावा? पिता-पुत्राचा धर्म एक असतो. मग समशेरबहाद्दरच्या मुंजीस विरोध का?... प्रश्न-उपप्रश्नांच्या गुंत्याचा आक्रोश त्यांच्या पत्रातही दिसतो.

शेक्सपियरन कथानकाची उंची गाठणाऱ्या या जोडीच्या प्रेमभावनेस संकुचित दृष्टिकोनातून का बघण्यात आलं? ते मला कळेना. उत्तर शोधताना वाटलं की यास महाराष्ट्राची मानसिकता जबाबदार असावी. इतरत्र आपल्या माणसांच्या लहान-सहान पैलुंचं उदात्तीकरण होतं. आपुलकीनं कर्तृत्वाचे पोवाडे गायले जातात. पण महाराष्ट्रास स्वजनांवर कोरडे ओढण्याची खोड! म्हणून असं झालं की शतकांसाठी आदरणीय ठरणारा पैलू वर्तमानाच्या टाचक्या नजरेत सामावू शकत नाही, म्हणून? पावन धवल प्रीतीचं महाराष्ट्रानं बाजीरावचं लफडं असं हीन मूल्यांकन केलं, म्हणून इतरांनी ते तुच्छ ठरवलं असावं. मेल्या म्हशीला पाच शेर दूध, या म्हणीचा न्यायही त्यांना मिळाला नाही. महाराष्ट्राने या जोडीच्या भावनेस मरणानंतरही सन्मान दिला नाही. आप मूए पीछे डूब गई दुनिया, हे खरं तरी आपले लोक चांगले होते वा आहेत, हे कबूल करण्यास महाराष्ट्र कमी का पडतो, ते मला कळत नाही.

ज्या संबंधाची खोली मापता येईल असा समर्थ मापदंड आपल्यापाशी नाही तो संबंध उपहासपात्र वा सवंग ठरवण्याचा करंटेपणा महाराष्ट्राने केला. मी त्यास पूर्णपणे अपवाद नव्हते. लफडं न म्हणता अफेअर म्हणत असे इतकंच! केळकरकाकांच्या भेटीनं नि नंतरच्या अभ्यासाने मनात अपराधी भाव निर्माण केला. या संदर्भात केलेल्या लेखनानंच याचं क्षालन होईल, असं वाटणं भावनेच्या आहारी जाणं नव्हतं. पत्रांच्या रुपात त्यास सत्याचं अधिष्ठान मिळालं होतं. पेशवे कुटुंब मस्तानीचं सतीत्व जाणून असल्याचा पुरावाही पत्रात मिळाला. पेशव्यांबरोबर मस्तानीनं देह ठेवल्यावर समशेरबहाद्दरचं पेशवे कुटुंबात लालनपालन झाल्याची नोंद आहे. पानिपतच्या युद्धात चिमाजीपुत्र सदाशिवराव भाऊ, नानासाहेबपुत्र विश्वासराव आणि बाजीराव-मस्तानीपुत्र

समशेरबहाद्दर यांनी तलवार गाजवली. नाना फडणवीस यांनी लिहिलेल्या पत्रात समशेरबहाद्दर आणि त्याचा पुत्र अलीबहाद्दर यांचा सन्मानपूर्वक उल्लेख आहे. शिवाय मस्तानीचाही नानांनी थोरल्या बहाद्दरांच्या मातोश्री असा सन्मानाने उल्लेख केला आहे. शिवरायांचा उल्लेख मिसगायडेड पॅट्रीओट असा होतो त्या देशात पेशवे-मस्तानीची धवल प्रीती लफडं ठरल्यास फारसं नवल वाटू नये.

केळकरकाकांपाशी कादंबरीचा संकल्प ओठी आला होता. अभ्यासासाठी त्यांचं मार्गदर्शन लाभल्यानं लेखन लवकर सुरू झालं. वेगात! वीस प्रकरणांचं लेखन मनाजोगं होत असल्याचा आनंद उपभोगत असताना दूरदर्शननं काकांनी देह ठेवल्याची बातमी दिली. काळजात कळ उठवणारी! आमची भेट झाली तेव्हा ते जराजर्जर होते. ते शतक पार करतील, असं समजणं माझा स्वप्नील आशावाद! हे कळत असूनही बातमी ऐकून माझ्या हातातून लेखणी निसटली. साहित्यात कप्तानपद मिळवा, हा आशीर्वाद देणारे केळकरकाका पाहणार नसतील तर कादंबरी पूर्ण करू नाही, असं वाटलं. झालेलं लिखाण मी पेटीच्या तळात गाडलं.

सुरूवातीस घरच्यांनी विरोध केला. मी लेखन थांबवलं नव्हतं. उलट गुजरातीच्या बरोबरीनं मराठीत लिहू लागले होते. पण या कादंबरीचं लेखन नको वाटत होतं. अशावेळी दूरदर्शनवर राऊ मालिकेची घोषणा झाली. स्वामीसारखी उत्तम मालिका बघण्यास मन आतुरलं. पण तीन भाग संपले तरी मन रमेना. आमच्याकडे गुजराती विख्यात कवी आणि पत्रकार श्री. बकुल टेलर आले असताना या संदर्भात चर्चा निघाली. बकुलभाई मराठी साहित्याचा सहज आस्वाद घेतात. राऊ मालिकेच्या संदर्भात मी कुरकुरताच स्वाती - आम्ही कौतुकानं खडूस समीक्षक म्हणतो ती तटकन् म्हणाली, ”स्वतःला काही करायचं नाही आणि... !” वाक्य अर्धं टाकून परिणाम साधण्याची तिला सवय! स्वाभाविकच बकुलभाईंची मुद्रा प्रश्नार्थक बनली. घरच्या चौकड्यानं माझ्या विरोधात फळी उघडली. राऊ मालिकेकडे गप्पा वळल्या नि ही चर्चा माझ्या विरोधात असल्याचं विसरून मी बोलू लागले...

”मस्तानीचं सादरीकरण सवंग तवायफसारखं होतंय. अशी स्त्री आवडली असती तर पेशव्यांनी जनानखाना उघडला असता. त्यांनी मस्तानीचा आग्रह का धरला याचा विचारच नाही!” मी तावातावानं म्हणाले, ”प्रियकराची सहधर्मचारिणी होण्यासाठी ती मराठी शिकत होती. बिनधास्त मानसिकतेच्या पेशव्यांना पत्नीनं नावानं बोलवावं अशी हौस! काशीबाई लाजाळू! म्हणून त्यांनी मस्तानीस गळ घातली तेव्हा मराठी भाषा सरावाची झाली नसल्यानं ती बाजीराऊ म्हणाली. पेशव्यांना ते फार गोड वाटलं. त्यांनी तिनं नेहमी राऊ म्हणावं असा लाडीक आग्रह धरला!”

”पण मालिकेत सारे पेशव्यांना राऊस्वामी म्हणतात!” बकुलभाईंचा प्रश्न!

"काय की! त्यांचाही अभ्यास असेल!" माझं गुळमुळीत उत्तर.

"लिखाणाची कच्ची प्रत कितपत बरी आहे?" त्यांनी विचारलं. त्याचं अक्षर सुरेख आहे. माझ्या फेअर प्रतीलाही चांगलं म्हणण्याचा उपचार ते पाळत नाहीत. माझ्या अक्षरास अवाच्य म्हणतात. माझ्यावर त्याचा परिणाम नसतो. मी मराठीत शिकले असल्यानं माझ्या गुजराती अक्षरास मराठी वळण असणं स्वाभाविक आहे, असं मीही ठणकावून सांगते. त्यांच्या या प्रश्नासही माझ्यापाशी निगरगट्ट उत्तर होतं.

"कच्ची प्रत कधी सलग नसते. त्यात कावळ्याचे पाय, शून्य फुल्या, चांदण्यांची उधळण असणारच!"

ही चर्चा सुरू झाल्यापासून सिद्धार्थ अंतर्धान पावले होते. विरोध दर्शवण्याचा हा राजमार्ग असेल, असं समजून मी दुर्लक्ष केलं. पण नेमक्यावेळी ते प्रगटले. चेहऱ्यावर विजयी भाव नि हातात बाड! मी दचकले. पेटीच्या तळातून बाड काढताना त्यांनी पेटीवरील नि आतील वस्तुंची जमिनीवर गौर मांडलेली मला बसल्या जागेवरून दिसली. घड्याळात दोन वाजले असून पाच वाजल्यासारखे वाटून मी हैराण!

"बघा यात काही कळलं तर... !" बाड बकुलभाईंच्या हाती देऊन ते कृतकृत्य झाले. घरी न जाता बकुलभाई बसल्याजागी चिकटले. बाड शोधण्याचा शीण घालवायला ह्यांनी पाय पसरून डोळे मिटले. मुलं पसार झाली नि मी आतली गौर आवरायला पदर बांधला. दोन तासांनी बकुलभाई गंभीर चेहऱ्यानं आत आले. अगदीच टाकाऊ झालंय काय या संशयानं मी अस्वस्थ झाले. छापायचं नसेल तर कसंही असलं तरी मला काय, असा पवित्रा मी घेतला. ते भिजल्या स्वरात म्हणाले, "धिस इज टू मच, स्मिताबेन!"

"क्... काय?" मी चाचरले. छापायचं नसलं तरी कुणी तोंडावर टाकाऊ म्हटलं तर पचवणं अवघडच वाटणार!

"हे असं अर्धवट वाचायला मिळणं इज अ टॉर्चर!"

"आणि अर्धवट लिहिणं इज अ क्राईम!" स्वातीदेवी केव्हा टपकल्या ते मला ठाऊक नव्हतं. "त्या आजोबांनी तुला अपेक्षा नि हौशीनं त्यांचा खजिना दाखवला. नि तू.... !" पुन्हा अर्धवट वाक्याचा प्रयोग! लगेच सर्वांनी कालवा केला. घरच्या चांडाळचौकडीत बकुलभाईंची भर पडल्यानं साऱ्यांना जोर आला. पाचमुखी परमेश्वर बोलतो, असं म्हणून सहचरानं सभा बरखास्त केली. आता हटवादीपणा करणं निर्लज्जपणाची सीमा ठरणार होती. मी पुन्हा कादंबरी हाती घेतली. लेखनानं वेग घेतलाही, पण हे लेखन एकटाकी न होण्याचा योग! अपघातात माझा उजवा हात जायबंदी

झाला. सुमारे दहा महिने तो काम करत नव्हता. डिक्टेशन, लेखनिका हे प्रकार मला जमले नाहीत. साऱ्यांनी आशा सोडली. पण वर्षभरानंतर एका सोमवारी बकुलभाईंचा सुरतेहून फोन आला. ते नवगुजरात टाईम्सच्या रविवारीय साहित्य पुरवणीचे संपादन करत. त्यात येणारी धारावाहिक कादंबरी दिड महिन्यानं संपणार असल्याची त्यांनी माहिती दिली. मग कालच्या पेपरमध्ये आगामी आकर्षणात बाजीराव मस्तानीवरील कादंबरीचा घोषणा केल्याचे सांगून ते म्हणाले, "आता तुम्हाला कादंबरी पूर्ण करावीच लागेल."

"भलतंच काय? माझं प्रेम आहे त्या कथानकावर! मला गुंडाळायची नाहीय कादंबरी!" मी तणतणले. पण जय्यत तयारीनिशी ते बसले होते. त्यांनाही कादंबरी उरकणं नको होतं. मी तातडीनं कादंबरी देऊ शकणार नाही, हे ही! तुटलेली लिंक जुळवण्यास महत्व होतंच. साऱ्यावर त्यांनीच तोडगा दिला.

"कादंबरी पूर्ण करण्याची घाई करू नका." मी गोंधळले. ते शांतपणे बोलतच होते, "लिहिलेल्या प्रकरणांची फेअर प्रत करा. म्हणजे लिंक जुळेल. फेअर केलेली प्रकरणे मला पाठवा नि पुढची प्रकरणं निवांतपणे लिहा. घोषणा केली तरी सॉरी म्हणून माघार घेता येते. पण माझी ती रीत नाही, हे तुम्ही जाणता. मला कादंबरी हवीच आहे, बस! दॅट्स ऑल!" मला त्यांचा आग्रह आवडला नि सल्लाही! त्यानुसार ४७ प्रकरणांच्या महाकादंबरीचं लेखन पूर्ण झालं. केवळ बकुलभाई खनपटीस बसले म्हणून!

जून ९५ मध्ये पुण्यास जाणं झालं. काही दिवसात कादंबरीचं पुस्तक प्रकाशित होणार होतं. तोवर स्त्री मासिकात मी बरंच लिखाण केलं होतं. संपादिका मृणालिनी चितळे यांच्याशी सूर जुळले होते. म्हणून त्यांना भेटायला मी स्त्री मासिकाच्या कचेरीत गेले. ह.मो. मराठे यांनी नुकती पुन्हा किर्लोस्करची धुरा घेतली होती. मृणालिनीनं त्यांचा परिचय करून दिला. सध्या नवं काय, या प्रश्नाच्या उत्तरात काही दिवसात श्वेत प्रेमनां रक्तिम पडछाया ही महाकादंबरी प्रकाशित होणार असल्याचं मी म्हणाले. नकळत केळकरकाकांचा विषय निघाला. त्यांना त्यात रस वाटला. कादंबरीची जन्मकथा किस्त्रीम दिवाळी अंकासाठी लिहा असं सांगून ते म्हणाले, "आणि एक करा. त्या वस्तुसंग्रहालयातून थोरल्या बाजीरावांच्या निदान एका पत्राची फोटोकॉपी सोबत जोडा!"

मला कल्पना आवडली. त्या कादगपत्रास उंबरठा ओलांडू न देण्याचा विचार काकांचा! ते नसल्यानं आता हे जमेलसं वाटलं. शिवाय ह.मो. झेरोक्स मशीन म्युझियममध्ये नेण्याची व्यवस्था होऊ शकते, असं म्हणाल्यानं मला सोपं वाटलं. दुसऱ्या दिवशी मी केळकर वस्तुसंग्रहालयात गेले. तिथे नव्याने लागलेल्या व्यवस्थापक मुलाने कपाटाच्या चाव्या त्याच्याजवळ नसल्याचा खेद व्यक्त केला. कपाट उघडण्याचा ज्यांना अधिकार होता ते आठवडाभर पुण्याबाहेर होते. माझं वास्तव्य मुंबईत! म्हणून त्याने माझा फोन नंबर टिपून घेतला. मीही पुरावादाखल एक पत्र लिहून

केळकरकाकांबरोबरचा एक फोटो पाठवण्याचा शब्द दिला. पाठपुरावा करण्याचं काम मृणालिनीस सोपून मी मुंबईस परतले. दिवाळी बरीच दूर होती. झेरोक्स मिळाल्यावर लेख लिहिता येणार होता.

जुलै अखेरपर्यंत मृणालिनीची डाळ शिजली नाही. ऑगस्ट महिन्यात वर्षाचं जिवावरचं दुखणं उपटलं. त्यातून सहिसलामत बाहेर पडणं झालं तरी दोन-तीन महिने इतर सारे विचार डोक्यातून हद्दपार होते. त्यात दिल्लीस बदली झाल्यानं मी जानेवारीत यावं असं सांगून सिद्धार्थ निघून गेले. प्रकृती सुधरवून वर्षा सासरी गेली. मग मला केळकर म्युझियम आठवलं. दिवाळी केव्हाच संपली होती. तरी मला हस्ताक्षराची फोटो कॉपी हवीशी वाटली. पेशव्याच्याच नव्हे तर नाना फडणवीसांच्या हस्ताक्षराचीही! दिल्लीस जाण्यापूर्वी मी पुण्यास गेले. फक्त फोटोकॉपी आणायला!

केळकर म्युझियममध्ये माझा फोन नंबर टिपून घेणारा मुलगा नव्हता. त्याच्या जागी वैतागलेला व्यवस्थापक आला होता. मी सकाळी गेले तर त्याने सायंकाळी येण्यास सांगितलं. मग सकाळी गेलं की संध्याकाळी या, सायंकाळी गेल्यास सकाळी या असं म्हणायचा. या उडवाउडवीचा मला अर्थ कळेल, अशी त्याची अपेक्षा! पण मी प्रामाणिकपणे पाच फेऱ्या घातल्या. पाचव्या फेरीवेळी गलिच्छपणे दात कोरत तिरसटला, "या कपाटात ढिगानं रद्दी पडली आहे. तुम्हाला हवा तो कागद शोधायला ती कुणाला वेळ नाही!" मी ते बासन आणि कागद बघितलं होतं. म्हणून मी तत्परतेनं कागद शोधण्याची तयारी दर्शवली तर तो ओरडला, "हे कुलूप उघडण्याचंही कौशल्य असेल तर उघडा कपाट नि उपसा रद्दी! जा बाई! आम्ही तुमच्यासारखे रीकामटेकडे नाही फालतू रद्दी उपसायला की तुम्हाला उत्तर द्यायला!.... "

खूप वेळ तो करवादत होता. ज्या कपाटात अनमोल खजिना असल्याचं केळकरकाका म्हणाले होते तिकडे बोट दाखवून वारंवार रद्दी शब्द उच्चारत तिरस्कारानं बघत होता. त्यास किती कमी पगार मिळतो, काम कसं कटकटीचं नि फार असतं (तो फक्त दात कोरत असून) ते ऐकवत होता. स्तब्ध झाल्यानं मी काहीवेळ श्रोत्याची भूमिका केली. त्याचं कामावर प्रेम नसल्याचं नि तो कामचोरी करत कमी पगाराचं रडगाणं गाणारा असल्याचं जाणवलं नि मी भानावर आले. निरोप घेण्याची औपचारिकताही नको वाटून परतीच्या मार्गास लागले. जीभ गप्प असली तरी मनात कागारव दाटला होता...

झेरोक्स मशिन तिथं नेण्याची कल्पना तेव्हाच सुचली असती तर बरं झालं असतं हा विचार वांझच! कदाचित अत्यंत अनपेक्षित मिळालेल्या संधीच्या भारावलेपणामुळं काही सुचलं नसावं. असं वाटलं. कपाटातील खजिन्याचं महत्व कळणारे केळकराकाका अतीतात गडप झाले होते. आता रद्दी ठरणारे कागद कसरीचे खाद्य ठरणार वा कुणा डॉलरधारकाच्या पोतडीत जमा होणार पण मला दिसणार नाहीत हा विचार उदास करत होता. हताश मनानं मुंबईस परतले नि मग

दिल्लीस! नंतर घडलेला अमेरिकेचा दौरा, स्वातीचं बाळंतपण यात दिवस वाऱ्याच्या वेगानं धावत होते. स्वाती नि बाळ घरात असल्यानं हा सल विस्मरणात गेला. पण १९९६ च्या २५ डिसेंबरला गुजराती साहित्य परिषदेनं या कादंबरीस १९९५ सालची सर्वोत्कृष्ट साहित्यकृतीचा बहुमान जाहिर केला नि साऱ्या आठवणी उफाळल्या.

हा गौरव माझ्या शब्दकळेचा नसून केळकरकाकांचा असल्याची जाणीव मला हळवं करत होती. त्यांनी पारितोषिकानं ओटी भरली माहेरवाशिणीची असं म्हणताना कंठ दाटून आला. ऐकणाऱ्या स्वातीचाही! मग आदल्या डिसेंबरात घातलेले खेटे आठवले. कार्य करणाऱ्याचं झपाटलेपण ते संभाळण्याचा हक्क असलेल्याच्या ठायी नसणं थोडं स्वाभाविकही वाटलं. पण त्या झपाटलेपणाचा अंश माझ्यापर्यंत - नव्हे माझ्या मुलांपर्यंत पोहोचला, याचं समाधान होतं. काळजात कोरलेली ती आठवण झेरोक्स कॉपी न मागणारी! श्वेत प्रेमनां... महाराष्ट्राची सीमा ओलांडून विदेशातील गुजू नि गुजराती वाचणाऱ्या मराठी वाचकांच्या मनात स्थान मिळवलं, ही तू केळकरकाकांना दिलेली श्रद्धांजली आहे, असं स्वाती म्हणाली. ते मला पटलंही!

पुढे देशातून उचलबांगडी झाल्यानं संघर्ष उभा ठाकला. हिवाळ्यात भारतात येणं जमू लागल्यावर बकुलभाईंची भेट घडली. मनाची समजूत घातली असूनही त्यांच्या समक्ष केळकर म्युझियमच्या भेटीत पदरात पडलेला अपमान ओठी आला. तेव्हाच झेरोक्स मशीन तिथे नेण्याचं सुचलं नाही, याविषयी हळहळही! बकुलभाई अत्यंत परखड! त्यांची प्रतिक्रिया त्यांच्यासारखी....

”ती भूक तुमची नव्हती. तुमचा पिंड संशोधकाचा असता तर तुम्हाला हे सुचलं असतं. तुम्ही तिथे गेलात संपादकानं पत्राची फोटो कॉपी मागितली म्हणून! नाहीतर पुन्हा तिकडे फिरकला नसतात. तुम्हाला पत्राच्या कॉपी काढायच्या होत्या काकांना वाचण्याचे श्रम पडू नयेत यासाठी. बाकी काकांशी ऐसपैस गप्पा मारत मजकूर जाणणं तुम्हाला अधिक आवडलं. कारण तुमचा पिंड कादंबरीकाराचा! हे तुम्हालाही कळतंय. केळकरकाकांच्या भेटीचं जे फलित तुम्हा उभयतांना अभिप्रेत होतं ते सोळा आणे सिद्ध झाल्यावर ही चुटपूट खाजवून काढलेली खरुज! जो आनंद लाभला त्यावर समाधान मानलंत सहज बरी होणारी!”

त्यांचं म्हणणं खरं असंल तरीही वाटलं, शंभर टक्के समाधान कुणालाही प्राप्त होत नाही. असमाधान हे कादंबरीकाराचं प्राक्तन असतं. नंतरही माझं बरेचदा पुण्यास जाणं झालं. आता पुण्यात माझं विंटर होम आहे. तरी त्या जोडे खाण्याच्या प्रसंगानंतर मी केळकर म्युझियममध्ये जाण्यासाठी जोडे झिजवले नाहीत, हे खरं! पत्राची झेरोक्स प्रत मिळवण्याचा नाद सोडणं हा माझा पिंड इतिहाससंशोधकाचा नसून कादंबरीकाराचा असल्याचा पुरावा आहे, असं मी समजते.

**- स्मिता भागवत**